Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

Research Article

‘साहित्य आणि राजकारण यांचा अनुबंध’

प्रा.डॉ.शिवाजीराव मा.देशमुख
मराठी विभाग, तुळजाभवानी महाविदयालय, तुळजापूर.

प्रास्ताविक .

महाराष्ट्र हा जसा सुधारणावादी विचारांसाठी संपन्न आहे, तसेच शिक्षणव्यवस्थेसाठी व समृध्द साहित्यसंपदेसाठी प्रसिध्द आहे. त्याचप्रमाणे राजकारणासाठीही प्रसिध्द आहे. स्वातंत्र्यपूर्वी व स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रमध्ये विविधरंगी राजकीय जीवन नांदत आहे. गेल्या अनेक वर्षांत परकीयांप्रमाणेच स्वकीयांबरोबरही संघर्षाचे अनेक प्रसंग आले, नेमस्त उदारमतवादी आणि जहाल क्रांतीवादी अशा विचारधारा पूर्वी होत्या, तशाच आताही काही प्रमाणात पाहावयास मिळतात. विचारांचा संघर्ष हे महाराष्ट्राच्या जीवनपध्दतीचे अविभाज्य अंग आहे. संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न,गोवा मुक्ती संग्राम, आणिबाणी विविध मोर्चे, कामगार संप, आंदोलने यामधून महाराष्ट्राचाचे क्षात्रतेज पाहावयास मिळते. शेतकऱ्यांचे लढे, सहकार चळवळ, दलितांचा संघर्ष, मोर्चे संप, आंदोलने रास्त अरास्त मागण्यासाठी एखाद्या गटाने सगळ्या समाजाला वेठीला धरण्याच्या प्रकारांचे चित्रण हा साहित्यिकांच्या चिंतेचा व चिंतनाचा विषय बनत आहे.

ज्या ठिकाणी दोन माणसांचा संबंध येतो, त्याठिकाणी सत्तासंघर्ष अटळपणे उद्‌भवतो, आणि सत्तासंघर्षातून राजकारणाचे जटिल व कुटिल रसायन बनते, की जे अनेकांच्या अस्तित्वाचा एक अविभाज्य भाग बनला आहे. त्यामुळे पानपट्टीवाल्यापासून विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागात काम करणाऱ्या व्यक्तीपर्यंत सर्वजन राजकारणाबाबत तर्क-कुतर्क, शंका-कुशंका व्यक्त करतात. त्यामुळे राजकारण हा जीवनाचा महत्त्वाचा भाग असल्यामुळे त्याचे वास्तव आणि कलापूर्ण चित्रणाचा अनुबंध मराठी साहित्यात पाहावयास मिळतो. राजकारण हे काही अलग वा स्वायत्त क्षेत्र नाही, जीवनाच्या विविध क्षेत्रामधील चढउतार उदा. उसाचा व साखरेचा भाव, धरणांचे व विजेचे प्रकल्प या बरोबरीने जनसंघटनांची काही मागण्यांसाठी होत असलेली आंदोलने विकास नीतीचा प्रश्न, परिवर्तनवादी सामाजिक चळवळी आणि राज्याच्या सुव्यवस्थेची हमी घेतलेल्या सनदी अधिकाऱ्याशी असणारे संबंध इत्यादी घटकांवर प्रभाव टाकणाऱ्या बाबींचे चित्रण साहित्यात आलेले आहेच. व्यवहार आणि मूल्ये यांचा पराकोटीचा संघर्ष ज्यातून क्षणोक्षणी प्रकट होतो. आणि एका अर्थाने आपल्या सगळ्या जीवनाला जे व्यापून उरते अशा राजकारणाचे साद-पडसाद मराठी ललित व वैचारिक साहित्यात कमी-अधिक तीव्रतेने उमटले आहेत. यातून राजकारण आणि साहित्य यांचा अनुबंध प्रत्ययास येतो. भांडवलशाही राजकारणाची चिकित्सा अनेकांनी केली आहे.

“मानवी जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात सत्तासंघर्ष व मूल्यसंघर्ष जेव्हा एकमेकांना जोडून येतात, कोणत्याही सत्तासंबंधाबाबत मूल्यात्मक प्रश्न उपस्थित होतात, तेव्हा राजकीय साहित्यकृती निर्माण होते.” समाज म्हटले की सत्ताकारण आलेच, या समाजात राहात असताना व्यक्तीचा मूल्यांवर, निष्ठांवर, अभिव्यक्तीवर अनेक घटकांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम होत असतो. लेखक हा शेवटी माणूसच असल्यामुळे या सर्व घटनांचे पडसाद त्याच्या साहित्यकृतीत उमटत असतात. म्हणूनच साहित्य आणि राजकारण यांचा थेट अनुबंध आहे. रशियन कादंबरीकार निगुगी वॉ कियाँगो म्हणतात, **“प्रत्येक लेखक हा राजकारणी लेखक असतो.”** प्रश्न इतकाच की तो कोणते आणि कोणाचे राजकारण लिहितो.

साहित्य आणि राजकारणाचे अनुबंध शोधताना राजकारणात साहित्यिकांची भूमिका कोणती हे महत्त्वाचे ठरते. राजकीय साहित्य बहुधा बाजु घेते किंवा विद्रोह पुकारते अथवा आपल्याला पटलेल्या इष्ट तत्त्वाच्या पुरस्कारासाठी लेखकाने साहित्यकृतींची रचना केलेली असते. लेखक हा आपल्या कलाकृतीच्या माध्यमातून मानवी व्यक्तिमत्त्वाला आकार देण्याचे, सुसंस्कृत नागरिक

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

घडवण्याचे मौलिक कार्य करत असतो. समतेवर, मानवी मूल्यांवर आधारित लोकशाही प्रस्थापित करुन समाजाला प्रगतीकडे नेण्याचे काम तो करतो. म्हणूनच साहित्य आणि राजकारणाचे अन्योन्य अनुबंध आहेत हे मान्य करावे लागते.

गांधी हे आधुनिक काळातील जागतिक किर्तीचे राजकीय पुढारी मानले जातात. आणि भारतीय राजकारणात त्यांचा फार महत्त्वाचा सहभाग आहे. राजकारण हा त्यांच्या प्रयोगशील अध्यात्मिक साधनेतील परिस्थितीप्राप्त कर्तव्याचा केवळ एक अंश होता. ते स्वत:ला राज्याचे नम्र उपासक, शोधक आणि सेवक मानित त्यांच्या मते सत्य हाच ईश्वर आपण प्रयोगशील वृत्तीने या सत्याचा शोध घेत आहोत. त्यांची साहित्याच्या विविध दालनातील कामगिरी लक्षणीय आहे. त्यांचे आत्मचरित्र, गीतेवरील भाष्य, वृत्तपत्रलेखन विविध प्रकारचा पत्रव्यवहार, हिंदस्वराज नावाची पुस्तिका जीवनाच्या नव्या आणि विधायक दिशा दाखविते.

लोकहितवादीच्या 'शतपत्राचे महत्त्व' त्यांच्यातील पुरोगामी विचारांमुळेच मान्य झाले आहे. म.जोतिराव फुले यांनी मांडलेला समतेचा विचार हा ही फार महत्त्वाचा होता. मानवमुक्तीची चळवळ त्यांनी उभी केली. ते चिंतनशील वृत्तीचे एक लेखकही होते. साहित्याकडे पाहाण्याचा त्यांचा दृष्टिकोन साचेबंद नव्हता. शोषित माणसाला बंडखोरीची प्रेरणा देण्यासाठी ते लिहित राहिले. समाज बदलण्याची भूमिका घेऊनच त्यांनी साहित्य निर्मिती केली. वौचारिक साहित्यात फुल्यांच्या ग्रंथामुळे भर पडली आहे. 'शेतकऱ्यांचा आसूड', 'गुलामगिरी' 'सार्वजनिक सत्यधर्म' ग्रंथाचा शस्त्रासारखा उपयोग करुन समाजवृक्षावर उत्पन्न झालेली बांडगुळे छाटून टाकण्यासाठी त्यांनी लेखन केले. लोकरंजनाची भूमिका त्यांच्या साहित्याने स्वीकारली नाही. १८८५ मध्ये इंडियन नॅशनल कॉग्रेसची स्थापना झाल्यानंतर आगरकर आणि **लोकमान्य टिळक यांनी राजकीय विषयावर जे वौचारिक लेखन केले ते मराठी साहित्याचे वैभव आहे.** स्वातंत्र्यवीर सावरकरांनी जो राष्ट्रवाद मांडला तो मुख्यत: मॅझिनीच्या विचारावर आधारलेला होता. १९३२ सालानंतर समाजवादी विचारांचा प्रभाव वाढला हा विचार अनेकांनी मांडला ना.ग. गोरे, बापूसाहेब काळदाते यांनी पुस्तकरुपाने मांडला. काकासाहेब गाडगीळ जसे राजकारणात वावरले तसे ते साहित्यकारणातही रमले. त्यांच्या हातून जी साहित्यसेवा घडली ती समग्र साहित्याच्या एकंदर बावीस खंडात प्रसिध्द झाली आहे. सन १९६२ मध्ये सातारा येथे झालेल्या साहित्यसंमेलनाचे ते अध्यक्ष होते. 'ग्यानबाचे अर्थशास्त्र', 'राज्यव्यवहार' या सारख्या पुस्तकांमधून राजकारणाच्या विविध अंगानी ओळख होते. शिवाय लोकशिक्षणाचे कामही त्यांनी केले आहे. व्यक्ती स्वातंत्र्याचा आग्रह,मानवतेची प्रतिष्ठा आणि सामाजिक गुलामगिरीचा निषेध ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विचारप्रणाली होती. अस्पृश्यतेच्या आगीत होरपळत असलेल्या दलितांच्या मुक्तीसाठी त्यांनी राजकारण व समाजकारण केले. मराठीमध्ये त्यांचे लेखन ग्रंथरुपाने प्रसिध्द आहे. ते अतिशय आशययुक्त आहे. राजकारण हे साहित्याला उर्जा देण्याचे काम करत असते. राजकारण हा कल्पनेच्या साह्याने रंगविण्याचा विषय नाही. राजकारणात विलक्षण धग असते. राजकारणाशिवाय सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रात भरीव प्रगती होत नाही. त्यामुळे राजकीय सत्ता ही अभ्यासू व्यक्तीच्या हातात असली पाहिजे, स्वातंत्रपूर्व काळात जी माणसे राजकारणाकडे आकृष्ट झाली, त्यांना स्वातंत्र्यलढ्या व्यतिरिक्त जीवनातील अन्य सर्व गोष्टी गौण वाटल्या. **स्वप्न पेटल्याशिवाय स्वातंत्र्य उगवत नाही.** म्हणून जनसामान्यांच्या डोळ्यात सतत शोषणमुक्त समाजनिर्मितीचे स्वप्न तेवत ठेवण्याचे कार्य लेखकांनी त्या काळात आपल्या कलाकृतींच्या माध्यमातून केले.

सामाजिक एकात्मता साधण्यासाठी साहित्याचा उपयोग होतो. साहित्याला आपण राजकारणापासून वेगळे ठेवू शकत नाही. साहित्य व राजकारण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. राजकारणाच्या वाटमारीत सामाजिक मूल्ये पायदळी तुडवली जातात. महत्त्वाच्या विषयाला बगल देऊन कमी महत्त्वाच्या मुद्याकडे लक्ष वेधले जाते. जातीचा उपयोग करुन जातीय तणाव निर्माण केला जातो. या सर्व गोष्टींचे सर्जनशील लेखकाने तटस्थपणे लेखन करणे आवश्यक आहे. तेंव्हाच साहित्य व राजकारणाचे अनुबंध आपल्याला पाहावयास मिळतात.

राजकारणातील वृत्ती,प्रवृत्ती, शह-कटशह प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष अनुभवल्यावर साहित्यिकांनी साहित्य निर्मिती केल्या तर त्यातून चिरंतन सत्याचा शोध लागेल. एखाद्या नेत्याची खोटी स्तुती करुन स्वार्थ साधून घेण्यापेक्षा थेट वास्तवाला भिडणारे परखड लेखन केले तर जनजाणिवांचे प्रतिबिंब त्या साहित्यात पडेल. त्यासाठी लेखकाने कालसापेक्ष विषय हाताळून साहित्यनिर्मिती केल्यास उत्तम कलाकृती निर्माण होईल. **लेखकाने समाजाकडे, राजकारणाकडे तुच्छतेने न पाहाता त्यात भले काय? नि बुरे काय? याचा शोध घेऊन निर्भिडपणे लेखन करणे आवश्यक आहे.** राजकारणातील डावपेच समजून घेऊन विविध वाङ्.मय प्रकारातून ते मांडावेत. साहित्य हे राजकारणाला कलाटणी देऊ शकते. जगातील विविध राज्यक्रांतीला वैचारिक साहित्यानेच प्रेरणा दिली आहे. साहित्य ही एक जबरदस्त शक्ती आहे. लाकडाच्या पोटात जसा अग्नी दडलेला असतो तशी साहित्याच्या पोटात क्रांतीची बीजे दडलेली असतात. साहित्यिक हे खऱ्या अर्थाने समाजाचे प्रतिनिधी असतात. राज्यकर्त्यांच्या दहशतीमुळे राजकारणाबद्दल जाणीवपूर्वक लेखन न केल्याचे दुर्दैवी चित्र पाहावयास मिळते. रशियात स्टॅलिनच्या काळात साहित्यावर बंदी आली होती अरुण साधू यांच्या 'सिंहासन' या कादंबरीस आणि विनय हार्डीकर यांच्या 'जनांचा प्रवाह चालीला' पुस्तकास शासकीय पुरस्कार मिळाले

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

होते. हे दोन्ही पुरस्कार अंतुले सरकारने रद्द ठरवले. गडकरी म्हणतात " जो हस्तक्षेप मंत्रिमंडळाने कधीही केला नव्हता तो अंतुले मंत्रिमंडळाने केला, आणि एका परीने लेखन स्वातंत्र्यावर आक्रमण केले. " 'बाईंडरचे दिवस'(कमलाकर सारंग) या पुस्तकात लेखन स्वातंत्र्य अथवा आविष्कार स्वातंत्र्यावरील आक्रमणाचा एक इतिहास झालेला आहे. युवक कॉग्रेस,शिवसेना या संघटनांनी 'सखाराम बांईडर' या नाटकाचे प्रयोग बंद पाडण्याचे प्रयत्न केले. त्यातून बाळासाहेब ठाकरे यांना प्रयोग दाखविणे आणि कमलाकर सारंग यांच्यावर झालेली टीका इ. वृतांत वाचल्यावर राजकारण कुठपर्यंत जाते हे लक्षात येते. किंवा तस्लिमा नसरीन यांना कट्टर मुस्लिमांकडून धमक्या दिल्या जातात, वगैरे संदर्भ महत्त्वाचे वाटतात.

राजकारणात काय चालते दूर राहून समजत नाही. तर भेट जवळिकीतून गोष्टी जाणून घ्याव्या लागतात. समाजातील सर्वच घडामोडीवर प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे राजकारणाची छाप पडत असते. कारण कायदे करणारे आणि ते राबविणारे लोक हा समाजाचा मध्यबिंदू असतो. त्यांच्या आसाभोवती सर्व समाज फिरत असतो. कुठल्याही समाजाचा उत्कर्ष किंवा अपकर्ष हा त्या देशातील समाजातील राज्यकर्त्यांवर अवलंबून असतो. डोंगरदऱ्यातील माणसात आत्मविश्वास पेरुन स्वराज्य स्थापन करणे तेही राजकारणच असते. एका राज्याचे दोन राज्य करुन भयानक दंगली उठवणारेही राजकारण आणि राज्यकर्तेच असतात. निवडणुका, राजकीय पक्ष, त्यांच्या घोषणा, आश्वासने, गुंड,स्मगलर,दहशतवादी,गुन्हेगार यांच्याशी असलेले राज्यकर्त्यांचे संबंध यामुळे जनता संभ्रमात सापडते.भयग्रस्त होते. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांकडेही गांभिर्याने पाहिले जात नाही, तेंव्हा अशा भावशुन्य राजकीय व्यक्तिमत्वाचा शोध घेऊन साहित्यिकांनी आपली भावांदोलने साहित्यातून मांडाली तर निश्चितच वास्तव चित्र समाजासमोर येईल. महाभारत म्हणजे काय आहे, तर एक राजकारणच आहे. याचाच अर्थ राजकारणच महाकाव्याची आणि महानायकाची निर्मिती करु शकते.

राजकारण हे सर्वस्पर्शी क्षेत्र असल्याने कोणतेही अनुभव क्षेत्र त्याला वर्ज्य नाही. राजकीय, सामाजिक क्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण कार्य करणाऱ्या अशा व्यक्तींना जीवनात विविध अनुभव येतात. त्यामुळे अशा व्यक्ती आत्मचरित्र लेखनास प्रवृत्त होतात. अहिताग्नी राजवाडे, नानासाहेब चाफेकर, केशवराव भवाळकर आणि शंकरराव देव या नामवंत व्यक्तींची जीवनचरित्रे आली आहेत. वि.रा.शिंदे- 'माझ्या आठवणी', ना.ग. गोरे- 'कारागृहाच्या भिंती', आचार्य आत्रे- 'कऱ्हेचे पाणी', एस्.एम्. जोशी- 'मी एस्.एम् जोशी', प्रबोधनकार ठाकरे- 'माझी जीवनगाथा', काकासाहेब गाडगीळ- 'पथिक', यशवंतराव चव्हाण- 'कृष्णाकाठ', मोहन धारिया- 'सफर', स्वामी रामानंद तीर्थ- 'हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्रामाच्या आठवणी', गोदावरी परुळेकर- 'जेव्हा माणूस जागा होतो', गंगाधर देशपांडे- 'माझी जीवनगाथा'अशा आत्मचरित्रातून तत्कालिन राजकारणाचे प्रतिबिंब पाहावयास मिळते. निवडणूका, डाव्या चळवळी,दलित मुक्तीलढा,हैद्राबाद आणि गोवा स्वातंत्र्य-संग्राम, आणिबाणी, आंदोलने,सत्तेसाठी चाललेले राजकारण आणि माणसाच्या सर्वांगिण उन्नतीसाठी चाललेले राजकारण या विषयावर सहभाग व भल्याबुऱ्या आठवणींचे चित्रण आले आहे. तसेच या आत्मवृत्तातून टिळक-गांधीजीच्या नेतृत्वाचे चित्रण आणि समकालिन राजकीय व्यक्तींचीचित्रे व सामाजिक परिस्थिती आली आहे.

मराठी कादंबरीचा राजकारणाशी असलेला अनुबंध विशेषतः स्थूलपणे पुढील कादंबऱ्यातून दिसतो. अरुण साधू- 'मुंबई दिनांक,' 'सिंहासन,' रंगनाथ पठारे यांची 'ताम्रपट' अनिल थत्ते यांचा 'डोंबाऱ्यांचा खेळ,' एकनाथ साळवे यांची 'एन्कांउटर,' मधू सावंत यांची 'राहू-केतू,' मंगेश विश्वासराव यांची 'मुख्यमंत्री', रविंद्र शोभणे –'पडघम' रा.र. बोराडे-'आमदार सौभाग्यवती' अजेय झणकर- 'सरकारनामा' ग.प्र.प्रधान- साठा उत्तराची कहाणी, तसे ह.ना.आपटे यांच्या काळापासून अशा अनेक कादंबऱ्यांचे संदर्भ घेता येतील.

मराठी नाटकांमधूनही राजकारण आणि साहित्य याचा अनुबंध दिसतो. मामा वरेरकर यांचा 'अपूर्व बंगला', वि.वा. शिरवाडकर यांचे 'मी एक मुख्यमंत्री',पुरुषोत्तम बेर्डे 'अलवरा डाकू', जयवंत दळवी- 'सूर्यास्त',विजय तेंडूलकर- 'व्दंव्दीपाचा मुकाबला' बाळ कोल्हटकर 'सीमेवरुन परत जा',प्रकाश त्रिभुवन- 'थांबा! रामराज्य येतयं!', गो.पू.देशपांडे-'अंधारवाटा' योगिराज वाघमारे -'सभापती' या नाटकांतून साहित्य आणि राजकारण यांचा थेट संबंध दिसून येतो. आचार्य अत्रे, नारायण सुर्वे, सुरेश भट, रामदास फुटाणे, फ.मु. शिंदे यांच्या कवितेतील राजकीय व्यंगाला एक लखलखीत सामाजिक बाजू आहे.

याशवंतराव चव्हाणांनी सत्तेचे विकेंद्रीकरण केल्याने सत्ताकारण उपेक्षित लोकांच्या दारापर्यंत येऊन पोहोचले,घृणा व तिरस्कारातून उत्कृष्ट साहित्यनिर्मिती शक्य नाही, प्रेम,जिव्हाळा व सकारात्मक दृष्टीकोनातूनच चांगली साहित्य निर्मिती होऊ शकते. राजकारणाविषयीच्या स्वागतशील भूमिकेतूनच अनेक कलाकृती वाचनीय झाल्या आहेत. याशवंतराव चव्हाणांपासून ते गडाखापर्यंत

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

राजकारणी व्यक्तीसुध्दा साहित्याच्या क्षेत्रात उत्तम लेखन करु शकले. राजकारणाविषयीच्या सकारात्मक भूमिकेतून भविष्यात साहित्य आणि राजकारणाचे अनुबंध दृढ होतील.

यशवंतरावांनी समाजकारणाचे, साहित्याचे आणि राजकारणाचे एकत्रीकरण केले. साहित्य हाच त्यांचा श्वास आणि शब्द हेच त्यांचे निःश्वास होते. शब्द सामर्थ्यावर आणि शब्द सौदर्यंवर त्यांचा नितांत विश्वास होता. शब्द तारतातही आणि शब्द मारतातही शब्द हे माणसाला प्राप्त झालेली कवच कुंडले आहेत. साहित्यिकांनी समाजाचे प्रश्न सोडवावेत, समाजाच्या कल्याणासाठी प्रयत्न करावेत म्हणून शब्दावर प्रेम करावे, विचारावर निष्ठा ठेवावी, आणि मूल्यावर श्रध्दा असेल तर साहित्य हे धारदार शस्त्रापेक्षा सुध्दा अधिक परिणाम साधू शकते. अशा साहित्यामुळे साहित्यिक जिवंत राहतात. " **मोठे मोठे सम्राट येतात आणि जातात, त्याचे नामोनिशाणही राहत नाही परंतु शब्दधन, विचारधन हे चिरंजीव चिरतरुण असते. म्हणून सम्राट संपतात, पण शेक्सपिअर सारखा साहित्यिक अजरामर होतो. तुकारामाचे अभंग बुडविणारे मातीमोल होतात, परंतु तुकारामांचे स्थान अभंग राहाते."** साहित्यिंकाबद्दल आदर बाळगण्यात, त्यांचा सन्मान करण्यात यशवंतरावांना आनंद वाटत होता. ग.दि. माडगुळकर, ना.धो महानोर, सरोजनी बाबर अशा साहित्यिकांना आमदारकी बहाल करण्यात त्यांचाच वाटा होता. ग. दि. माडगुळकरांच्या मृत्युनंतर **'पापण्यात गोठविली मी नदी आसवांची'** हे शब्द त्यांच्या मनःपटलावर दीर्घकाळ उमटत राहिले. 'छत्रपती शिवराय' महाकाव्याच्या प्रकाशन समारंभाच्या वेळी ते म्हणाले होते, " मी सरस्वतीचा किंचित मानकरी आहे. अशा परिस्थितीत या सरस्वतीच्या दरबारात व्यासपीठावर मिरवताना मला अतिसंकोच वाटत आहे." 'छावा' ही शिवाजी सावंतांची कादंबरी त्यांनी प्रतापगडावर जाऊन भवानी मातेच्या चरणी अर्पण केली, त्यावेळी लेखक शिवाजी सावंत जसलोक हॉस्पीटलमध्ये आजारी होते, यावरुन लेखक आणि राजकारणी यांचा अनुबंध स्पष्ट होतो. स.न.१९७५ मध्ये श्रीमती दुर्गाताईच्या अध्यक्षेखाली कराडला अखिल भारतीय साहित्य संमेलन झाले. त्यावेळी साहित्य संमेलनाचे स्वागत अध्यक्ष यशवंतराव होते. आणिबाणीचा तो काळ होता. लेखन स्वातंत्र्याच्या बंदीमुळे सर्वत्र तणावपूर्ण वातावरण होते. त्याप्रसंगी यशवंतरावांनी अतिशय गंभीर व सौम्यपणे आपले विचार मांडले. **"प्राचीन काळी तपस्व्यांच्या आश्रमात शिरताना राज्यकर्ते आपली राजचिन्हे काढून साध्या वेशात जात असत तसेच शारदेच्या उपवनात येताना भारत सरकारच्या मंत्रीपदाची बिरुदावली मी बाहेर ठेवून आलो आहे.माझ्या मातृभाषेवर प्रेम करणारा एक मराठी माणूस म्हणून मी येथे आलो आहे."** अशा भावपूर्ण साहित्यिक रसवंताने अनेकांना थक्क केले. असे त्यांचे राजकारण प्रतिबध्दतेचे व वचनपूर्तीचे होते. कटुता न ठेवणे आणि कटूता नसणारे वातावरण वाढविले. हा त्यांचा स्वभावधर्म होता. आपल्या लेखनातून समाज मनाचे कप्पे ते उघडत राहिले.

समारोप .

सत्ता ही विश्वस्त या नात्याने सांभाळायची असते, हे तत्त्व आता राहिले नाही. यशवंतराव चव्हाणांच्या काळातील असलेला राजकारणाचा नैतिक व जनकल्याणकारी चेहरा आज बराच विद्रुप झाल्याचे दिसतो. हे चित्र अस्वस्थ करणारे आहे. म्हणून साहित्यिक आणि राज्यकर्ते यांनी विधायक विचाराचे बीज रक्तात भिजत घातले पाहिजे व ते रुजले पाहिजे तरच त्यांना कोंब फुटतील व त्यास कालंतराने गोड फळे येतील,असा विश्वास वाटतो.

" प्रातःकाळ हा विशाल भुवंर, सुंदर लेणी तयात खोदा"

संदर्भ ग्रंथ .

१ शैलीकार यशवंतराव चव्हाण . डॉ. शिवाजीराव देशमुख
२ यशवंतराव चव्हाण यांचे समीक्षालेखन व भाषणे. डॉ शिवाजीराव देशमुख
३ मराठी राजकीय कादंबरी . डॉ नलिनी महाडिक
४ गांधीवाद आणि आधुनिक मराठी साहित्य . संपादक पुंडे दत्तात्रय
५ आणीबाणी च्या कालखंडातील मराठी साहित्य . मेधा टेंगशे
६ महाराष्टातील राजकारणाचे साहित्यातील प्रतिबिंब. संपादन विलास खोले